**मा.जिल्हादंडाधिकारी रायगड यांचे अध्यक्ष्क्षतेखाली दि.०८/०८/२०१९ रोजी दुपारी ४.३० वाजता जिल्हास्तरीय स्वतंत्र पर्यावरण सननियत्रंण दलाची बैठक.**

मा.राष्ट्रीय हरित लवाद, दिल्ली यांनी दिलेल्या निर्देशानुसार प्रदुषित नदी पट्टयामधील प्रदुषण रोखण्यासाठी स्वत्रुत पर्यावरण सननियत्रंण दलाची (Special Environment Surveillance Task Force) ची स्थापना करणेबाबत निर्देश दिलेले होते. त्यास अनुसरुन जिल्हास्तरीय स्वत्रंत पर्यावरण सननियत्रंण दलाची कमिटी दि.०२/०८/२०१९ रोजी गठीत करण्यात आली. सदर कृती दलाची बैठक मा. जिल्हादंडाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली दि.०८/०८/२०१९ रोजी घेण्यात आली. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. मा.जिल्हादंडाधिकारी रायगड | अध्यक्ष |
| २. श्री. पी.डी.बाबर, पोलीस उप अधीक्षक रायगड | सदस्य |
| ३. श्री. जयदिप मोहिते, सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण रायगड | सदस्य |
| ४. श्री. जगन्नाथ साळुंखे, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ रायगड | सदस्य |

सदर बैठकीचे वेळी श्री. जगन्नाथ साळुंखे, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ रायगड यांनी मा. अध्यक्ष व सदस्यांचे स्वागत करुन रायगड जिल्हयातील प्रदुषीत नदयांच्या पट्टयामधील प्रदुषण कमी करण्यासाठी तसेच मा. राष्ट्रीय हरित लवाद, दिल्ली यांचे निर्देशाबाबत संपूर्ण कमिटीस अवगत केले.

प्रादेशिक अधिकारी यांनी रायगड जिल्हयातील एकूण ४ नंदयाच्या प्रदुषित पट्टयाबाबत (१.पाताळगंगा नदी, २.कुंडलिका नदी, ३. अंबा नदी, ४. सावित्री नदी) माहिती देवून प्रदुषणाबाबत कमिटीस अवगत केले.

बैठकी दरम्यान मा.जिल्हादंडाधिकारी रायगड यांनी वरील चार प्रदुषण पट्टयातील नदयांच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या सर्व ग्रामपंचायत, नगर पंचायत, नगरपरिषद, नगर पालिका व महानगर पालिका यांनी मा. न्यायालयाच्या आदेशा नुसार व सदर बैठकीच्या संदर्भाने स्वतंत्र निर्देश देणेस आणि सर्वांनी घरगुती सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारण्यास तसेच भुयारी गटारी योजनेबाबत पुर्तता करण्या संदर्भात निर्देश देण्याचे ठरले. तसेच या कार्यक्षेत्रामध्ये योणाऱ्या औद्योगिक वसाहतीमधील सीईटीपी प्रकल्पांना सदर प्रकल्प शास्त्रज्ञ पध्दतीने व म.प्र.नि. मंडळाच्या सहमती पत्रातील अटी व शर्ती नुसार कार्यान्वीत ठेवण्यासाठी निर्देश देण्याचे ठरले.

मा. जिल्हादंडाधिकारी यांनी मा.राष्ट्रीय हरित लवाद, दिल्ली न्यायालयाच्या आदेशाचे पुर्णपणे पालन करुन या नदी पट्टयामध्ये प्रदुषण होणार नाही याबाबत सर्व सदस्यांना सुचना देवून तसेच आढावा बैठकां घेवून सुधारणा करण्याबाबत सुचना करण्यात आल्या

प्रादेशिक अधिकारी यांनी मा.अध्यक्ष व सदस्यांचे आभार मानून बैठक समाप्त झाली

**डॉ.विजय सूर्यवंशी**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**

स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दल :- नदी संवर्धन
०८/०८/२०१९

| क्र | सदस्य | सही |
|---|---|---|
| १. | मा. डॉ. विजय सुर्यवंशी<br>अध्यक्ष, जिल्हाधिकारी, रायगड | |
| २) | पी. डी. खाकर<br>पोलीस उप अधिक्षक (गृह) रायगड<br>(जिल्हा पोलीस अधिक्षक यांचे प्रतिनिधी) | |
| ३) | संदीप ज. मोरे<br>सचिव<br>जिल्हा विधीसेवा प्राधिकरण<br>रायगड | |
| ४) | जगन्नाथ साळुंखे<br>प्रादेशिक अधिकारी<br>मप्रनि मंडळ, रायगड | |
| ५) | सागर औटी<br>उप-प्रादेशिक अधिकारी महाड | |